सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | सौ.दिपमाला मनोज काळे (मा.महापौर) | १)सन्मा.नगरसेविका श्रीमती रिटा विनोद सपकाळे यांचे पती स्वस्त धान्य परवानाधारक कै.विनोद (पिंटूभाऊ) सपकाळे, २)सन्मा.नगरसेविका ॲड शुचिता हाडा यांचे काका कै.मोहन जैन, ३)शहरातील प्रसिध्द स्त्री रोगतज्ञ श्री.राधेश्याम चौधरी यांचे वडील आदर्श शिक्षक कै.धर्मराज चंपालाल चौधरी (डि.सी.चौधरी), ४)भारताच्या जेष्ठ पार्श्वगायिका व पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित कै.आशा भोसले, ५)जळगांव शहर महानगरपालिकेचे माजी विधी समिती सदस्य श्री.धिरज सोनी यांच्या पत्नी कै.आरती सोनी, ६)शहरातील प्रसिध्द डॉक्टर कै.सोमनाथ काळू पाटील, ७)शहरातील पत्रकार श्री.गोपीचंद सोरडे यांच्या पत्नी कै.अंजली गोपीचंद सोरडे, ८)शहरातील खुबचंद सागरमल विदयालयाचे शिक्षक कै.भास्कर कोळी सर यांचे दुखद: निधनाबद्दल. |
| २. | १) श्री.मनोज सुरेश चोधरी (मा.उपमहापौर)<br>२) डॉ.श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील मा.सभापती,स्थायी समिती | सन्मा.नगरसेविका श्रीमती रिटा विनोद सपकाळे यांचे पती स्वस्त धान्य परवानाधारक तसेच समाजसेवक कै.विनोद (पिंटूभाऊ) सपकाळे यांचे दुखद: निधनाबद्दल. |
| ३. | डॉ.श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील, मा.सभापती,स्थायी समिती | १)जळगांव येथील कै.डॉ.सोमनाथ काळू पाटील, २)भारताच्या संगीत क्षेत्रातील अजरामर व अष्टपैलू आवाज असलेल्या कै.आशा भोसले यांचे दुखद: निधनाबद्दल. |
| ४. | श्री.विष्णु रामदास भंगाळे | १)भारतातील ज्येष्ठ पार्श्वगायिका आणि पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित कै.आशा भोसले, २) सन्मा. नगरसेविका श्रीमती रिटा सपकाळे यांचे पती कै.विनोद प्रभाकर सपकाळे, ३)सामाजिक कार्यकर्ते मेघराज, रविंद्र व प्रमोद नेमाडे यांचे वडील कै.सुभाष किसनराव नेमाडे तसेच ज्ञात अज्ञात जळगांव मनपा संबंधीत माजी पदाधिकारी अथवा आजी माजी कर्मचारी यांचे दुखद: निधनाबद्दल. |
| ५. | सौ.उज्वला मोहन (किरण) बेंडाळे | १)स्वरसम्राज्ञी कै.आशाताई भोसले, २)जैन इरिगेशनचे वरीष्ठ सहकारी डॉ.श्री.अनिल ढाके यांच्या मातोश्री कै.प्रमिला ढाके, ३) शहरातील जेष्ठ पत्रकार श्री.गोपीचंद सोरडे यांच्या पत्नी कै.अंजली गोपीचंद सोरडे यांचे दुखद: निधनाबद्दल. |
| ६. | सौ.रंजना विजय वानखेडे | १) सन्मा.नगरसेविका श्रीमती रिटा सपकाळे यांचे पती कै.विनोद प्रभाकर सपकाळे, २)भाजपा जळगांव ग्रामीण जिल्हाध्यक्ष व नगरसेवक डॉ.श्री.राधेश्याम चौधरी यांचे वडील सेवानिवृत्त शिक्षक कै.धर्मराज चंपालाल चौधरी यांचे दुखद: निधनाबद्दल. |
| ७. | श्री.भागचंद मोतीलाल जैन | प्रभाग क्रं.८ मधील कोळीवाडा येथिल रहिवासी १)कै.गं.भा.चंद्रभागाबाई आनंदा कोळी, २) ओमशांती नगर येथिल रहिवासी कै.वासुदेव पाटील, ३) बी.जे.नगर येथिल रहिवासी कै.श्रीमती सुनंदा रमेश जोशी, ४)कै.श्रीमती पद्माबाई दगडुलालजी गादीया, ५)दांडेकर नगर येथिल रहिवासी कै.सुशिलाबाई शिवाजी पाटील यांचे दुखद: निधनाबद्दल. |
| ८. | कु.प्रतिक्षा कैलास सोनवणे | जेष्ठ पार्श्वगायिका कै.श्रीमती आशाताई भोसले यांचे दुखद: निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

सही/-

**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**नगरसचिव,महानगरपालिका,जळगांव.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | १)श्री.मनोज सुरेश चौधरी, मा.उपमहापौर<br>२) डॉ.श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील, मा.सभापती, स्थायी समिती<br>३) श्री.नरेंद्र आत्माराम पाटील | साहित्य अकादमी, नवी दिल्ली यांच्याकडुन सन २०२५ चा प्रतिष्ठित साहित्य अकादमी पुरस्कार जळगांवचे सुपुत्र तसेच प्रख्यात लेखक श्री.राजु बाविस्कर यांना त्यांच्या "काळयानिळया रेषा" या मराठी आत्मचरित्रात्मक साहित्यकृतीसाठी अलिकडेच प्राप्त झाला असून साहित्य अकादमी पुरस्कार मिळाल्याबद्दल दि.१८ मार्च २०२६ रोजी मा.जिल्हाधिकारी, जळगांव जिल्हा यांच्या हातून देखिल त्यांचा सत्कार करण्यात आलेला असून साहित्य क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय, संवेदनशील व वास्तवदर्शी लेखनाची दखल घेऊन प्रदान करण्यात आलेला हा मानाचा पुरस्कार केवळ त्यांच्या वैयक्तिक यशाचा सन्मान नसून, तो मराठी साहित्यविश्वासाठी तसेच जळगांव शहरासाठी अत्यंत गौरवाची व अभिमानाची बाब आहे.<br>मराठी भाषा ही आपल्या संस्कृतीची, परंपरेची व अस्मितेची ओळख असून, अशा राष्ट्रीय पातळीवरील सन्मानामुळे मराठी भाषेचा गौरव अधिक अधोरेखित होतो. श्री.राजु बाविस्कर यांच्या साहित्यकृतीतून मराठी भाषेची समृध्दता, समाजजीवनाचे वास्तव आणि विचारांची प्रगल्भता प्रभावीपणे व्यक्त झाली असून, त्यांच्या या यशामुळे नव्या पिढीला प्रेरणा मिळत आहे.<br>त्यांच्या या कार्यामुळे केवळ साहित्य क्षेत्र समृध्द झाले नाही, तर मराठी भाषेचा सन्मान देशपातळीवर अधिक दृढ झाला आहे. ही बाब प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानाची असून, जळगांव शहराचे नावही त्यामुळे उज्ज्वल झाले आहे. जळगांव शहर महानगरपालिका श्री.राजु बाविस्कर यांचे हार्दिक अभिनंदन करित असून त्यांच्या पुढील लेखन कार्यासाठी सुयश चिंतीत आहे. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने हे सभागृह अभिनंदन करीत असुन त्यांचे उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहोत.

सही/-
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**नगरसचिव,महानगरपालिका,जळगांव.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५(२) चे तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्याची अर्हता व नियुक्त्या ) सुधारणा नियम २०१२ तसेच २३ मार्च २०२३ चे तरतुदीनुसार जळगांव शहर महानगरपालिकेत मान्यता प्राप्त पक्षाचे व गटांचे तौलनिक संख्याबळानुसार प्राप्त सात जागेसाठीचे नामनिर्देशन व त्याबाबत मा.आयुक्त यांचेकडून येणाऱ्या शिफारशींचा विचार करुन नामनिर्देशीत सदस्यांचे नामनिर्देशनास मान्यता देणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५(२) चे तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्याची अर्हता व नियुक्त्या ) सुधारणा नियम २०१२ तसेच २३ मार्च २०२३ चे तरतुदीनुसार जळगांव शहर महानगरपालिकेत मान्यता प्राप्त पक्षाचे व गटांचे तौलनिक संख्याबळानुसार सात जागेसाठीचे नामनिर्देशन करणे कामी सभागृहनेता तसेच सर्व पक्षीय गटनेत्यांची आयुक्त यांचेकडेस दि.०२/०३/२०२६, दि.२७/०३/२०२६ व दि.०२/०४/२०२६ रोजी बैठका आयोजित करण्यात आलेल्या होत्या. सर्व पक्षीय गटाचे तौलनिक संख्याबळानूसार सर्व पक्षीय गटनेते यांना नामनिर्देशित सदस्यांचे नामनिर्देशन सादर करणेबाबत दिलेल्या मुदतीत / मुदतवाढीच्या दरम्यान गटनेत्यांकडुन प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी करणेकामी आयुक्त यांनी अतिरीक्त आयुक्त यांना प्राधिकृत केलेले होते. त्यानूसार अतिरीक्त आयुक्त यांनी मुदतीत पक्षनिहाय प्राप्त झालेल्या अर्हताधारक नामनिर्देशित सदस्यांचे नामनिर्देशन पत्रांची छाननी करुन आयुक्त यांचेकडेस सादर केलेले असून त्यास आयुक्त यांनी पडताळणी अंती वैध ठरलेल्या खालील नमूद व्यक्तींची जळगांव शहर महानगरपालिकेच्या नामनिर्देशित सदस्यपदी नियुक्ती करणेस मा.महासभेची मान्यता मिळणेकामी शिफारस केलेली आहे.

| अ.नं. | नांव | पक्ष |
|---|---|---|
| १ | डॉ.श्री.चौधरी राधेश्याम धर्मराज | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्री.रोटे प्रदिप रामकृष्ण | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्री.मताणी रमेश रिझुराम | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्री.शौचे सुभाष बळवंत | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्री.मावळे हर्षल जयदेव | शिवसेना |
| ६ | श्री.सोनवणे नरेंद्र रामदास | शिवसेना |
| ७ | श्री.तायडे शरद शामराव | शिवसेना (उबाठा) |

उपरोक्त प्रमाणे आयुक्त यांनी पडताळणी अंती वैध ठरविलेल्या पक्षनिहाय पक्षीय बलाबलानूसार वर नमूद व्यक्तींची जळगांव शहर महानगरपालिकेच्या नामनिर्देशित सदस्यपदी नियुक्ती करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- श्री.दिपक ऊर्फ रुद्रेंद्र प्रभाकर सुर्यवंशी**

सही/-
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामांसाठी घेणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, महापौर यांचे कडोल जशमनपा यांचेकडील जा.क्र. जशमनपा/म.का/३५/२०२६ दि.१८/०३/२०२६ रोजीचे पत्राद्वारे प्रशासनाची दैनंदिन कामकाजास गती आणण्यासाठी शासकीय / निमशासकीय अनुभवी सेवा निवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत प्रस्ताव महासभेत सादर करणेबाबत निर्देश दिलेले होते.

जळगांव शहर महानगरपालिकेत सद्यस्थितीत वर्ग ३ चे कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या जवळपास अंदाजीत ३०० इतकी आहे. जळगांव महापालिकेत १९९७ मध्ये सरळ सेवेने कर्मचाऱ्यांची भरती झाली असून, तदनंतर तब्बल पंधरा वर्षानी २०११-१२ मध्ये फक्त लिपिक वर्गीय कर्मचारी भरती प्रक्रिया राबवण्यात आलेली होती. गेल्या १५ ते २० वर्षापासून आज पर्यंत भरती प्रक्रिया न राबवल्याने तसेच विहीत, वयोमानाने बहुतांश अनुभवी अधिकारी /अभियंते सेवानिवृत्त झाल्याने प्रत्येक विभागातील अधिकारी कर्मचारी यांच्याकडे अतिरिक्त पदभार सोपवण्यात आलेले आहेत. त्यामुळे कामाची गती संथ झालेली असून, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग, आरोग्य विभाग, लेखा विभाग, वित्त विभाग, विद्युत विभाग, प्रभाग समिती कार्यालय या ठिकाणी पाहिजे तितके तत्परतेने कामे होत नाहीत.

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण. २७१५/प्र.क्र. १०० (भाग-११/१३ दिनांक १७ डिसेंबर २०१६ व शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २७१५/प्र.क्र. १०० (भाग-१)/१३दिनांक ८ सप्टेंबर २०२३ नुसार माननीय महापौर यांनी निर्देश दिल्याप्रमाणे सेवानिवृत्त शासकीय / निमशासकीय अधिका-यांच्या सेवा करार पद्धतीने विवक्षित कामांसाठी घेणेबाबत तरतूद आहे. निवडणूक होऊन महानगरपालिकेत लोकनियुक्त सरकार स्थापन झालेले आहे. व खालील प्रमाणे कामे तातडीने करणे बाबत त्यांचा संकल्प आहे. मनपा सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य (स्वच्छता विभाग), पाणी पुरवठा विभाग, विद्युत विभाग. इ. विभागातील कामांना गती मिळणे तसेच घनकचरा प्रकल्प, अमृत योजना-२, भुयारी गटर्स, मनपाच्या जागा विकसीत करणे, ई-बस सेवा कार्यान्वीत करणे, मेहरुण तलाव व शिवाजी उद्यान सुशोभिकरण करणे अशी महत्त्वपूर्ण कामे पूर्ण करणेसाठी व प्रभावी अंमलबजावणीसाठी अनुभवी सेवानिवृत्त अधिकारी/अभियंता यांची आवश्यकता दर्शवलेली आहे.

तथापि वरील सर्व बाबींचा तसेच शासन निर्णय क्रमांक संकीर्ण. २७१५/प्र.क्र. १०० (भाग-११/१३ दिनांक १७ डिसेंबर २०१६ व शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २७१५/प्र.क्र. १०० (भाग-१)/१३दिनांक ८ सप्टेंबर २०२३ यात नमुद अटी व शर्ती नुसार जळगांव शहर महानगरपालिका व इतर केंद्र व राज्य शासनातील शासकीय / निमशासकीय विभागातील सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पध्दतीने सेवा घ्यावयाची झाल्यास यासंदर्भात अदा करावयाचे मानधन, क.अभियंता यांना रक्कम रु.३०,०००/- प्रतीमाह, प्रशासकीय अधिकारीकरीता रक्कम रु.२८,०००/- प्रतीमाह तसेच लिपीक वर्गीय कर्मचारी यांना रक्कम रु.२५,०००/- प्रतीमाह याप्रमाणे निश्चित करता येईल. आयुक्त यांना असलेल्या अधिकारानूसार योग्य त्या कर्मचाऱ्यांची निवड ६ महिन्याकरीता योग्य त्या प्रक्रियेचा अवलंब करुन निश्चिती करणे आवश्यक आहे. त्यानूसार प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (३) चे अनुषंगाने स्थायी समितीची मान्यता घेवुन मनपासाठी आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध करणे संदर्भात कार्यवाही करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६४** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- ॲड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा**

सही/-

**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

मा.महापौर यांचेकडिल पत्र क्र.जशमनपा/मका/१०/२०२६ दि.१८/०२/२०२६ नूसार प्रभाग समितीचे पुनर्गठन करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सदरचा प्रस्ताव तहकूब करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते तहकूब**

**अनुकुल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.दिपक ऊर्फ रुद्रेंद्र प्रभाकर सुर्यवंशी**

**अनुमोदक :- श्री.प्रकाश रावलमल बालाणी**

सही/-
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

मनपा निधी अंतर्गत जळगांव शहरातील प्रमुख नाले व उपनाले मान्सुनपुर्व साफसफाई करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, मनपा निधी अंतर्गत जळगांव शहरातील प्रमुख नाले व उपनाले मान्सुन पुर्व साफसफाई करणे या कामाचे अंदाजपत्रक राज्य दर सुची २०२२-२३ नुसार बनवलेले असुन या कामी रक्कम रु.३९,९१,४०३/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

सदर कामास मंजुरी प्राप्त झालेली असल्याने नाले साफसफाई करणे आवश्यक असल्याने मनपा निधी अंतर्गत जळगांव शहरातील प्रमुख नाले व उपनाले मान्सुनपुर्व साफसफाई करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु.३९,९१,४०३/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. याकामी त्वरीत निविदा प्रक्रिया राबवुन मान्यसुनपुर्व नाले साफसफाई होतील याबाबत प्रशासनाने दक्षता घ्यावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री.अरविंद भगवान देशमुख**
**अनुमोदक :- श्री.विजय लक्ष्मण बांदल**

सही/-
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

प्रभाग क्रं.१९ मेहरुण अंतर्गत टि.बी.एस.हॉस्पीटल परिसरात डॉग शेल्टर, हेल्थ क्लिनिक, फुड स्टोअर बांधणे कामाचे रक्कम रु.५१,०२,१०४/- मात्रच्या अंदाज पत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, केंद्र शासनाने तयार केलेल्या प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम २०२३ ची अंमलबजावणी करण्यास्तव आणि मा.सर्वोच्च न्यायलयाच्या Suo Moto Writ Petition (Civill) no (S) ०५ ०६ २०२५ या प्रकरणा मध्ये भटक्या कुत्र्यांमुळे लहान मुलांवर झालेल्या हल्याच्या पार्श्वभूमीवर जारी केलेल्या निर्देशांचे तातडीने अनुपाल करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहे. या प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायलयाने Suo Moto Writ Petition (Civill) no (S) ०५ of २०२५ दिलेल्या आदेशानुसार Animal Welfare Board of India यांनी दि.२७/११/२०२५ रोजी निर्गमीत केलेले Standard Operating Procedure नुसार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दि.०३/०२/२०३६ रोजी बैठक घेण्यात आली सदर बैठकीत प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम, २०२३ दि.१० मार्च २०२३ प मा. सर्वोच्च न्यायलयाच्या Suo Moto Writ Petition (Civill) no (S) ०५ of २०२५ मधिल निर्देशाचे काटेकोर पालन करणे कामी ए.बी.सी. सेन्टर मध्ये श्वानांना स्वतंत्र निवारण गृहामध्ये ठेवण्यासाठी व्यवस्था करणे व वार्ड निहाय फिडिंग झोन तयार करणे बाबत निर्देश देण्यात आले आहे. त्यानुसार Standard Operating Procedure मध्ये विहीत केलेल्या मार्गदर्शक नकाशानुसार, सुचनांनुसार १०० श्वानांच्या व्यवस्थेसाठी प्रभाग क्रं. १९ मेहरुण अंतर्गत टि. बी. एस. हॉस्पीटल परिसरात डॉग शेल्टर, हेल्थ क्लिनिक, फुड स्टोअर बांधकाम करणेसाठी रक्कम रु.५१,०२,१०४/- मात्रचे अंदाज पत्रक सन २०२४-२५ च्या राज्य दर सुची नुसार तयार करण्यात आलेले आहे. सदरचे अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- कु.प्रतिक्षा कैलास सोनवणे**
**अनुमोदक :- श्री.राजेंद्र झिपरु घुगे-पाटील**

सही/-
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

शासनामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या एजन्सीकडुन जळगांव शहरातील एलईडी पथदिव्यांची देखभाल दुरुस्ती करणे कामी धोरणात्मक निर्णय होणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव नामंजूर करण्यात येत असून सदर कामी मनपाने आपल्या स्तरावर निविदा प्रक्रिया राबवावी. राज्य शासनाने निश्चित करुन दिलेल्या एजन्सीचे मंजूर दरापेक्षा कमी दर आल्यास मनपाचा आर्थिक लाभ होवू शकतो याबाबीचा विचार करता जळगांव शहरातील एलईडी पथदिव्यांची देखभाल दुरुस्ती करणे कामी प्रशासनाने तातडीने निविदा प्रक्रिया राबवावी तोपर्यंत आहे त्या एजंन्सीकडुन काम करुन घेणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री.दिपक ऊर्फ रुद्रेंद्र प्रभाकर सुर्यवंशी**
**अनुमोदक :- श्री.विशाल सुरेश (राजुमामा) भोळे**

सही/-
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

**राज्यातील सर्व स्वराज्य संस्थामध्ये महाराष्ट्र जैविक विविधता नियम २००८ अंतर्गत जैविक विविधता व्यवस्थापन समिती गठीत होणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.**

असा ठराव करणेंत येत आहे की, राज्यातील सर्व स्वराज्य संस्थामध्ये महाराष्ट्र जैविक विविधता नियम २००८ अंतर्गत जैविक विविधता व्यवस्थापन समित्या गठीत होणे बंधनकारक आहे. महानगरपालिका स्तरावरील जैविक विविधता व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण रचना खालील प्रमाणे असावी.

| | |
|---|---|
| कार्यकारी मंडळ | स्वराज्य संस्थेचे ७ सदस्य, कृषी, पशुधन, वनोपज, आरोग्य, मासेमारी, आदीवासी शिक्षण इत्यादी क्षेत्रातील जाणकार असतील त्यात महिला/मागासर्गीय यांची योग्य प्रमाणात प्रतिनीधत्व असेल. |
| समिती सचिव | स्वराज्य संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी / किंवा तत्सम स्तराचे अधिकारी |
| निमत्रित सदस्य | वन, कृषी, पशुसंवधर्न, आरोग्य, मत्ससंवर्धन, आदीवासी विकास शिक्षण इत्यादी शासकीय विभागातील स्वराज्य संस्था स्तरावर उपलब्ध होणारे अधिकारी |
| विशेष निमंत्रित सदस्य | १. स्थानिक विधानसभा /लोकसभा विद्यमान सदस्य<br>अशा प्रकारे गठीत होणाऱ्या समितीमधील कार्यकारी मंडळातील सदस्यांना मतदान व निर्णय घेण्याचा हक्क राहील तर समिती सचिव, निमंत्रित सदस्य, आणि विशेष निमंत्रित सदस्यांना विविध तांत्रिक बाबीवर मार्गदर्शक व सल्ला देता येईल परंतु त्यांना मतदानाचा हक्क नसेल. जैविक विविधता व्यवस्थापन समितीचा अध्यक्ष हा स्थानिक संस्थेच्या अध्यक्षांनी अध्यक्षित केलेल्या सभेत सदस्यांमधुन घेणेचा आहे. सदर अध्यक्षांचा कालावधी तीन ते पाच वर्षाचा राहील. जैविक विविधता व्यवस्थापन समितीचे खालील प्रमाणे अधिकार असतील.<br>१) समितीच्या अधिकारीता क्षेत्रातील जैविक संसाधनांचे संरक्षण आणि त्या संसाधनांची शाश्वत निरंतर उपयोगीता निश्चित करणे,<br>२) समितीच्या अधिकारितेमधील जैविक संसाधन क्षेत्रामध्ये बेकायदेशीर प्रवेशावर बंद घालणे,<br>३) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण चेन्नई आणि महाराष्ट्र राज्य जैविक विविधता मंडळाला, गरज भासेल तेव्हा विविध विषयांवरील माहिती / मते सादर करणे,<br>४) समितीच्या अधिकारिते मधील जैविक संसाधन क्षेत्रातील संसाधने व्यावसायीक कारणा करता गोळा करण्यासाठी /तेथे प्रवेश करण्यासाठी नियमानुसार संकलन शुल्क आकारणीची वसुली करणे.<br>५) स्थानिक वैदु आणि जैविक संसाधपाचा वैद्यक क्षेत्रात वापर करणाऱ्यांची माहिती ठेवणे,<br>६) जैविक संसाधन असलेल्या क्षेत्रात प्रवेश करणे आणि पांरपारिक ज्ञान प्राप्त करणे, आकारलेली संकलन शुल्क आणि मिळालेला लाभ आणि त्या लाभाचे वाटपाची पध्दत इ. सर्व तपशील असलेली नोंदवही ठेवणे.<br>७) जैविक विविधतेचा दस्तावेज तयार करण्यात आणी त्याच्याशी संबंधीत पांरपारीक ज्ञान / माहिती मिळवण्यात सुध्दा जैविक विविधता व्यवसथापन समिती सक्रीय असले,<br>८) राष्ट्रीय जैविक विविधता प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य जैविक विविधता मंडळाने वेळोवेळी दर्शविलेल्या मार्गदर्शक तक्त्याप्रमाणे जैविक विविधता निधीचे व्यवस्थापन व वापर करणे. |

उपरोक्त अहवालानुसार महाराष्ट्र जैविक विविधता नियम २००८ अंतर्गत जैविक विविधता व्यवस्थापन समिती गठीत करणेस तसेच सदर समितीमध्ये खालील नमूद सदस्यांची नियुक्ती करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | नांव |
|---|---|
| १ | सौ. दिपमाला मनोज काळे – महापौर अध्यक्ष |
| २ | सौ.शोभा बाविस्कर - अतिरीक्त आयुक्त सचिव |
| ३ | श्रीमती अर्चना संजय पाटील सदस्य |
| ४ | श्री.सुनिल वामनराव खडके सदस्य |
| ५ | श्री.अमर भागचंद जैन सदस्य |
| ६ | श्रीमती निकीता सुरेश वंजारी सदस्य |
| ७ | श्री.संतोष मोतीराम पाटील सदस्य |

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६४** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.प्रकाश रावलमल बालाणी (पिंकी)**

**अनुमोदक :- श्री.अमित पांडुरंग (बंडुदादा) काळे**

सही/-

**(दिपमाला मनोज काळे)**

**महापौर**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**

**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

एकत्रित सुधारित प्रारुप विकास योजना (मुळ+वाढीव हद्द) जळगांव शहर महानगरपालिका (महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ (१) अन्वये मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करणेबाबत.) प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगाव शहर महानगरपालिकेच्या एकत्रित सुधारित प्रारूप विकास योजना (मूळ + वाढीव हद्द) तयार करण्याचे काम प्रगतिपथावर असून सदरचे काम नगर रचनाकार, विकास योजना, विशेष घटक, जळगाव शहर मनपा या कार्यालयामार्फत सुरू आहे.

शासनाचे दि. २५/०१/२०१९ रोजीचे शासन निर्णय व दि.१७/०६/२०१९ रोजीच्या शुध्दीपत्रकान्वये भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) आधारित द्रुतगती पद्धतीने विकास योजना तयार करण्यासाठी जळगाव शहर महानगरपालिकेने स्पर्धात्मक निविदा पद्धतीने मे. झेनोलिथ जिओसर्विसेस, पुणे या संस्थेस नियुक्त केलेले आहे.

अधिनियमाचे कलम २३ (१) सह ३८ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. १२२३, दि. २३/०८/२०२३ अन्वये जळगाव शहर महानगरपालिकेच्या मूळ हद्दी सह वाढीव हद्दीतील क्षेत्राची एकत्रित सुधारित विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर केलेला आहे. सदर इराद्याबाबतची सूचना दि. २८/०९/२०२३ रोजीच्या दैनिक लोकमत व दैनिक पुण्य नगरी या दोन स्थानिक वृत्तपत्रात, तसेच दि. १२/१०/२०२३ ते दि. १८/१०/२०२३ या कालावधीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक, नाशिक विभागीय पुरवणी मध्ये पृष्ठ क्र. २२ ते २३ वर मराठी व इंग्रजी भाषेमध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

अधिनियमाचे कलम २४ अन्वये सह संचालक, नगररचना, नाशिक विभाग, नाशिक यांचे पूर्व मान्यतेने आयुक्त, जळगाव शहर मनपा यांनी दि. ०६/०६/२०२४ रोजीच्या औपचारिक आदेशान्वये सहायक संचालक, नगररचना, जळगाव शहर मनपा यांची "नगर रचना अधिकारी" म्हणून नेमणूक केलेली आहे.

अधिनियमाचे कलम २५ नुसार दि. २२/०२/२०२४ पावेतो नियुक्त संस्थेस विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करणे आवश्यक होते. मात्र, विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्यास विलंब होत असल्याने सह संचालक, नगररचना, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडून मुदतवाढ मंजूर होऊन नियुक्त संस्थेने सदर विकास योजनेचा विद्यमान जमीन वापर नकाशा सह अहवाल दि. ०९/०८/२०२४ रोजी या कार्यालयाकडे सादर केला आहे. असा विद्यमान जमीन वापर नकाशा व अहवाल नगररचना अधिकारी यांनी पत्र जा. क्र. ५०, दि.१२/०८/२०२४ अन्वये नियोजन प्राधिकरणास हस्तांतरीत केलेला आहे.

अधिनियमातील तरतुदीनुसार कलम २६ (१) अन्वये विकास योजनेचा प्रारूप मसुदा तयार करून प्रसिद्ध करण्याची मूळ मुदत, इरादा महाराष्ट्र शासन राजपत्रात घोषित झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्ष, म्हणजेच दि.११/१०/२०२५ पावेतो होती. दरम्यानच्या कालावधीतील १) लोकसभा आदर्श आचारसंहिता २०२४, दि. १६/०३/२०२४ ते ०६/०६/२०२४ (८३ दिवस), २) पदवीधर शिक्षक मतदारसंघ व नाशिक विभागातील द्विवार्षिक निवडणूक २०२४, दि.२४/०५/२०२४ ते ०५/०७/२०२४ पैकी मुदतवाढीसाठी विचारात घ्यावयाचा कालावधी, दि.०७/०६/२०२४ ते ०५/०७/२०२४ (२९ दिवस), ३) विधानसभा निवडणूक आचारसंहिता २०२४, दि.१५/१०/२०२४ ते २५/११/२०२४ (४२ दिवस), व ४) महानगरपालिकांची सार्वत्रिक निवडणूक २०२५, दि.१५/१२/२०२५ ते दि. १६/०१/२०२६ (३३ दिवस); असे एकूण १८७ दिवसांचा आचारसंहिता कालावधी विचारात घेतल्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १४८-अ नुसार सदर प्रसिद्धिकरणाची मूळ मुदत दि.१६/०४/२०२६ पावेतो आहे.

उक्त विकास योजनेचा प्रारूप मसुदा तयार करून प्रसिद्ध करण्याची मूळ मुदत उपरोक्तपणे नमूद दि.१६/०४/२०२६ लवकरच संपुष्टात येत आहे. सद्यस्थितीस, तत्कालीन नगररचना अधिकारी यांचे नियंत्रणाखाली वि.यो.वि.घ. कार्यालयाद्वारे उक्त प्रारूप विकास योजना तयार करण्याचे काम जवळपास पूर्ण झालेले आहे. सदरचा प्रस्तावित जमीन वापर नकाशा नियुक्त संस्थेद्वारे GIS स्वरूपात तयार करण्यात आलेला आहे. असे असले तरी, खालील नमूद कारणांमुळे उक्त प्रारूप विकास योजना मूळ मुदतीत प्रसिद्ध करणे शक्य दिसून येत नाहीः

१) महानगरपालिकेकडे नियुक्त संस्थेचे सन २०१९ च्या निविदेनुसारचे देयक थकीत असल्यामुळे त्यांचेकडून उक्त विकास योजनेच्या कामात कोणतेही सहकार्य असणार नाही, असे नियुक्त संस्थेने कळविले आहे.

२) सदरच्या प्रारूप विकास योजनेचे संपूर्ण GIS Structure नियुक्त संस्थेकडे आहे. उक्त विकास योजना ही GIS आधारित असल्याने नियुक्त संस्थेच्या सहकार्याशिवाय तथा त्यांचा GIS तंत्रज्ञ उपलब्ध झाल्याशिवाय प्रस्तावित जमीन वापर नकाशा सादर करणे शक्य नाही.

३) कलम २६ अन्वये उक्त विकास योजनेच्या प्रसिद्धीकरणापूर्वी तयार करण्यात आलेला प्रारूप मसुदा सह संचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडून छाननी करून मान्यता मिळणे आवश्यक आहे. उक्त विकास योजना ही सुधारित स्वरूपाची असल्याने कामाचा व्याप पाहता विभागीय नगररचना कार्यालयास छाननीकामी किमान १ महिन्याचा अवधि लागण्याची शक्यता आहे.

४) छाननीअंती विभागीय नगररचना कार्यालयाने सुचविलेले बदल व दुरुस्ती अंतर्भूत करण्यास आणि तत्संबंधी कामे करण्यास देखील कालावधी लागणार आहे.

५) तद्नंतर, महानगरपालिकेचा कलम २६ अन्वये प्रारूप विकास योजना प्रसिद्ध करणेबाबतचा ठराव घेणे व त्याबाबतची सूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यासाठी देखील कालावधी आवश्यक आहे.

तथापि, उपरोक्त उल्लेखित सर्व बाबी पाहता सदरची मूळ मुदत संपुष्टात येणेपूर्वी उक्त प्रारूप विकास योजनेचे काम आणि प्रस्तुत अडचणी विचारात घेता अधिनियमाचे कलम २६ (१) अन्वये वाढीव मुदतवाढ घेणे संयुक्तिक ठरेल.

नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस १८१३/३२११/प्र.क्र.५०८/नवि-१३,दि.०१/१०/२०१६अन्वये महानगरपालिकांसाठी कलम २६ (१) अन्वये मुदतवाढ मंजूर करावयाचे अधिकार मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांस प्रत्यायोजित केलेले असल्यामुळे, अधिनियमाच्या कलम २६ (१) मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेने त्या आशयाचा ठराव पारित करून दि.१७/०४/२०२६ ते दि. १६/१०/२०२६ (६ महीने) पर्यंतचा मुदतवाढीचा प्रस्ताव संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

सबब, तथापि, उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६ (१) मधील तरतुदीनुसार उक्त विकास योजनेचा प्रारूप मसुदा तयार करून प्रसिद्ध करण्याच्या हेतूने दि.१७/०४/२०२६ ते दि. १६/१०/२०२६ (६ महीने) पर्यंतचा मुदतवाढीचा प्रस्ताव मूळ मुदत संपुष्टात येणेपूर्वी संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे मंजुरीस्तव सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री.नितिन बालमुकुंद लढ्ढा**
**अनुमोदक :- श्री.अरविंद भगवान देशमुख**

सही/-
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

विभागीय संचालक, ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गर्व्हमेंट यांचेकडिल पत्रानूसार नवनिर्वाचित महापौर व नगरसेवकांचे २ दिवसीय प्रशिक्षण आयोजित करणेबाबत मा.महापौर महोदया यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, विभागीय संचालक, ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गर्व्हमेंट यांचेकडिल अभास्थास्वसंस्था/ ८२३ दिनांक ०५/०३/२०२६ चे पत्रान्वये, महानगरपालिकेवर सोपविलेल्या कामांची व मनपा अधिनियमान्वये सोपविलेली जबाबदारी पाड पाडण्यासाठी मनपा सभा, स्थायी समिती व विषय समित्यांमध्ये विविध निर्णय घ्यावे लागतात. याकामी मनपा अधिनियम व सभा कामकाजाची सखोल माहिती सदस्यांना असणे आवश्यक आहे. याबाबत नगरसचिव विभागाकडुन जा.क्र./जशमनपा/नसवि/०१/२०२६ दि.०१/०४/२०२६ अन्वये नियोजना संदर्भात कळविण्यात आलेले आहे.

विभागीय संचालक, ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गर्व्हमेंट यांचे पत्राचे अनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिकेतील महापौर व सर्व निर्वाचित सदस्यांसाठी ०२ दिवसीय प्रशिक्षण आयोजित करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास तसेच विभागीय संचालक, ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गर्व्हमेंट यांचेशी याकामी येणाऱा एकूण खर्च व दिनांक निश्चित करणे कामी पत्रव्यवहार करणेस मान्यता प्रदान करणेत येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- ॲड सौ.सुचिता अतुलसिंह हाडा**

**अनुमोदक :- श्री.अमित पांडुरंग (बंडुदादा) काळे**

सही/-

**(दिपमाला मनोज काळे)**

**महापौर**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**

**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

लोकांमध्ये आदर्श व महान व्यक्तींचा विचारांचा आदर्श कायम बिंबविण्याकरीता स्वामी समर्थ चौकात मोठया व भव्य चौकात छत्रपती संभाजी राजेंचा पुतळा उभारण्याची परीसरातील नागरीकांची मागणीस परवानगी मिळणेबाबत रामेश्वर कॉलनी विकास फाउंडेशन,मेहरुण,जळगांव यांनी परीसरातील नागरीकांच्या सहीनिशी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, रामेश्वर कॉलनी परीसरात सर्व जाती धर्माचे नागरीक राहतात. छत्रपती संभाजी राजे हे खऱ्या तऱ्हेने रयतेचे राजे असून त्यांचे आदर्श विचार, त्यांची महिलांबाबत असलेली उच्च विचारसरणी यासारखे अन्य भरपुर गुणसंपन्न असलेले राजांचा पुतळा स्वामी समर्थ चौक,मेहरुण परीसरात उभारणेची परवानगी तसेच याकामी लागणाऱ्या निधीची मागणी रामेश्वर कॉलनी विकास फाउंडेशन,मेहरुण,जळगांव तसेच रामेश्वर कॉलनीतील व परीसरातील नागरीकांनी केली असून यामुळे जळगांव शहर सुंदर शहर या संकल्पनेत भर पडणार असल्याने पुतळा उभारण्याची परवानगी तसेच याकामी लागणारा निधी मंजूर करणेची मागणी केलेली आहे.

रामेश्वर कॉलनी विकास फाउंडेशन,मेहरुण,जळगांव तसेच रामेश्वर कॉलनीतील व परीसरातील नागरीकांचे मागणीनूसार रामेश्वर कॉलनीतील सर्वात मोठा चौक – अशोक किराणाकडुन जकात सोसायटी पर्यंतच्या व श्रीकृष्ण मेडीकल ते मंगलपुरी रस्त्यामधील स्वामी समर्थ चौकात रस्त्यावरील रहदारीस कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही यासह मनपा व इतर शासनस्तरावरील पुतळा समिती वा इतर आवश्यक त्या परवानग्या, अटी-शर्तीस बंधनकारक राहून छत्रपती संभाजी राजेंचा पुतळा उभारणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर कामी प्रशासनाने जागेची पाहणी करुन घ्यावी तसेच यापूढे असे प्रस्ताव हे प्रशासनामार्फत सादर करण्यात यावे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.विक्रम किसन सोनवणे**

**अनुमोदक :- श्री.राजेंद्र झिपरु घुगे-पाटील**

सही/-

**(दिपमाला मनोज काळे)**

**महापौर**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**

**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

प्रभाग क्रं.१ मधिल पिंप्राळा रेल्वे उड्डाणपुल सुरेश कलेक्शन जवळ सर्कल विकसित करणेबाबत सन्मा.सदस्य,ॲड दिलीप बबनराव  पोकळे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, प्रभाग क्रं.१ मधिल पिंप्राळा रेल्वे उड्डाणपुल सुरेश कलेक्शन जवळ सर्कल विकसित करणे कामी प्रशासनाने पाहणी करुन परीपूर्ण प्रस्ताव सादर करावा तोपावेतो सदरचा प्रस्ताव तहकूब करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते तहकुब**

**अनुकुल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लड्ढा**

**अनुमोदक :- श्री.दिपक ऊर्फ रुद्रेंद्र प्रभाकर सुर्यवंशी**

सही/-
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

शिवाजी नगर येथिल उड्डाणपुलास "छत्रपती शिवाजी महाराज उड्डाणपुल" तसेच रिंगरोड वरुन कानळदा रोडकडे येणाऱ्या उड्डाणपुलास "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उड्डाणपुल" असे नामकरण करणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.रिटा विनोट सपकाळे व सन्मा.सदस्य,श्री.सुरेश माणिक सोनवणे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, प्रशासनाने सदर पुलांना यापूर्वी नाव दिले गेले नसल्याबाबत खात्री करुन सर्व बाबी तपासून घ्याव्यात तोपर्यंत सदरचा प्रस्ताव तहकूब करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते तहकूब**

**अनुकुल मते :- ६४** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.अनिल सुरेश अडकमोल**

**अनुमोदक :- श्री.सुरेश माणिक सोनवणे**

सही/-
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**